अनधिकृत अकृषिक वापर

अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :अेनअेपी ३४८९/२४६/प्र.क्र. ३७/ल-२
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १८-९ -९३

वाचा :- शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. एनएपी १०८८/प्र.क्र. १३१५/ल-२, दिनांक २८-२-१९८९.

-: परिपत्रक :-

संदर्भाधीन दि. २८-२-१९८९ च्या शासन परिपत्रकान्वये अनधिकृत अकृषिक वापराबाबतच्या प्रकरणांवर जिल्हाधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकामधील परिच्छेद क्रमांक ३ [२] मध्ये सहा महिन्याच्या मुदतीनंतर जी प्रकरणे नियमानुकूल होणार नाहीत अशा प्रकरणांबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४५ [२] अन्वये अनुज्ञेय असलेली दंडनीय व अतिक्रमणे पाडून टाकण्याची कारवाई करावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

२. अनधिकृत अकृषिक वापराबाबत दंडाच्या नोटीसा बजावल्यानंतर पुणे, कोल्हापूर, सोलापूर परिसरातील काही संबंधीत व्यक्तींनी स्थानिक लोकप्रतीनिधी- मार्फत ही बाब शासनाकडे उपस्थित करताना दंड कमी करणे वा माफ करण्याबाबत विनंती केली होती. त्यावर याप्रकरणी शासनाने एकंदर वस्तुस्थिती काय आहे याबाबत आढावा घेतला असता अशा प्रकरणांची व्याप्ती फारच असल्याचे आढळून आले. तसेच अशा प्रकरणात दंड व अकृषिक आकारणी वसूल करण्याबाबत कारवाई झालेली असूनही सदर प्रकरणे नियमानुकूल करण्यासाठी अथवा इतर कारवाईसाठी प्रलंबित असल्याचे दिसून येते.

३. जी बांधकामे नियमानुकूल करणे शक्य नाही अशा बांधकामाबाबत कठोर कारवाई करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतो. हे विचारात घेऊन अशा प्रकरणांपैकी जास्तीतजास्त प्रकरणे नियमानुकूल करता येतील किंवा कसे याचा आढावा घेण्याचा शासनाचा विचार आहे. त्यासाठी अनधिकृत बांधकामाचा

कृ. मा. प.

आढावा घेऊन त्यातील जास्तीतजास्त प्रकरणे नियमानुकूल करण्याबाबत जिल्हानिहाय प्रस्ताव त्वरित शासनास सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( चं. वा. शिरवले )
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,